# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कोल्हापूर

## सुधारीत राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र. २

**१) <u>प्रस्तावाना</u>** :- गृह निर्माण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. गृनियो/२००८/प्र.क्र.९२/गृनिधो-१ दि.२७-८-२००८ अन्वये सुधारीत राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.२ कार्यान्वीत झाली आहे. सदर योजने अंतर्गत प्रति घरकूल रु.९०,०००/- इतके कर्ज बँकाकडून मंजूर करणेत येते. सदर कर्ज फेडीचा कालावधी १० वर्षे असून यापैकी पहिले एक वर्ष आस्थगत कालावधी असेल, पुढील ९ वर्षात कर्जाची परतफेड करावयाची आहे. सदर कर्जावरील व सुमारे रु. ३०००/- पर्यंतच्या विमा संरक्षणाच्या लाभ घेण्यासाठी अतिरिक्त कर्जाचे रक्कमेवरील स्टेट बँन्केच्या प्राईम लेन्डींग रेट-३ टक्के किंवा दरसाल कमाल १० टके यापैकी जो कमी असेल त्या दराने होणाऱ्या सरळ व्याजाची रक्कम राज्य शासन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळा मार्फत भरण्यात येणार आहे.

### २) योजनेतील निकष :-

१) लाभार्थी बेघर असला पाहिजे व त्याने यापूर्वी शासनाकडून घरकुलासाठी अनुदान मजुंर झालेले नसावे, तसा ग्रामपंचायतीचा दाखला आवश्यक.
२) लाभार्थ्याचा र.रु.९६,०००/- चे आतील उत्पन्नाचा तहसिलदार यांचा दाखला असणे आवश्यक.
३) ७५० स्वे.फुट जागा लाभार्थीच्या नावे असली पाहिजे.
४) रक्कम रू. १००००/- चा स्वहिस्सा भरणेस तयार असलेचे लाभार्थ्याने पत्र देणे.
५) लाभार्थीची जागा बोजा विरहीत असले बाबतचा तहसिलदार यांचा दाखला.
६) ग्राम पंचायती मध्ये अर्ज देऊन ग्रामसभेची मंजूरी आवश्यक. (ग्रामसभा ठराव)
७) ग्रामपंचायतीस सादर करावयाचे अर्ज पंचायत समिती/ग्रा.प.चे ठिकाणी मिळतील.

### ३) योजनेचा उद्देश :-

अनु.जाती,अनु.जमाती मुक्त वेठबिगार आणि अनु.जाती/जमातीचे नसलेले परंतु दारीद्रय रेषेवरील असणा-या कुटुंबाना घरे बांधुन देणे.

### ४) योजनेची अमंलबजावणी :-

सदरचे प्रस्ताव ग्रामपंचायती मार्फत पंचायत समिती कडे मंजुरी साठी सादर केले जाते तेथे छाननी होऊन प्रशासकिय मान्यतेसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे कडे पाठविली जातात. ग्रामपंचायतीस सादर करावयाचे अर्ज पंचायत समिती/ग्रा.प.चे ठिकाणी मिळतील.